**दिनेश वाघमारे**
भा.प्र.से.
**महापालिका आयुक्त**


अ.शा.क्र.नंमुंमपा/अतिक्रमण/ 1464 /2015
दिनांक : 23 /07/2015

प्रिय डॉ. रामास्वामी,

नवी मुंबई महानगरपालिकेने सार्वजनिक जागेवरील अनाधिकृत बांधकामे निष्कासित करण्याची मोहिम मोठया प्रमाणात सुरू केलेली आहे. यामध्ये अनाधिकृत बांधकाम धारकांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम 1966 व महाराष्ट्र महानगर प्रांतिक अधिनियम 1949 अन्वये नोटीस देऊन बांधकामावर कार्यवाही करण्यात येत आहे. या दरम्यान अनाधिकृत इमारती निर्माण करणाऱ्या व्यक्ती/विकासक सामान्य नागरीकांना अनाधिकृत इमारतीमधील फ्लॅट/दुकान विकतात व त्याबाबतची नोंदणी रजिष्ट्रेशन कार्यालयामध्ये करीत असतात.

अनेक भूमाफीया शहरामध्ये अनाधिकृत इमारती निर्माण करतात व त्यामधील फ्लॅट अथवा दुकान सामान्य नागरिकांना विकत देऊन निघून जातात. त्यानंतर सदर इमारतीवर महानगरपालिका, सिडको किंवा एम.आय.डी.सी., या प्राधिकरणांकडून निष्कासनाची कारवाई होत असते त्यामुळे अनाधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यक्तींकडून नागरिकांची फसवणूक झालेली असते. सामान्य नागरिकांना विकासकाने संबंधित प्राधिकरणाची बांधकाम परवानगी घेतली आहे किंवा नाही हे त्यांना माहित नसते त्यामुळे नागरिकांची फसवणूक होत असते

फ्लॅट विक्री व दुकान विक्री याबाबत होत असलेली रजिष्ट्रेशन सदर इमारतीच्या बांधकामास संबंधित प्राधिकरणाचे (नवी मुंबई महानगरपालिका/ सिडको/ एम.आय.डी.सी.) "बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र" असल्याशिवाय फ्लॅट अथवा दुकानाची नोंदणी आपल्या कार्यालयात करण्यात येऊ नये. अशा सूचना आपल्या अधिनस्त सब रजिस्ट्रार यांना देण्यात यावेत म्हणजे नोंदणी झाली नाही तर अनाधिकृत बांधकामावर प्रतिबंध होण्यास मदत होईल व सामान्य नागरिकांची फसवणूक होणार नाही.


नवी मुंबई महानगरपालिका

कार्यालय : भुखंड क्रं.१, सेक्टर-१५अ, पामबीच जंक्शन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४. दूरध्वनी : ०२२-२७५६७१७१ फॅक्स : ०२२-२७५७४४५७
E-mail : commissioner@nmmconline.com

अनेक जनहित याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये अनाधिकृत बांधकामावर कार्यवाही करण्याचे निर्देश वेळोवेळी दिलेले आहेत. अनाधिकृत बांधकामांवर नियंत्रण ठेवण्यासाठी आपले देखील सहकार्य आवश्यक आहे. याचाच भाग म्हणून नवी मुंबई महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये इमारतीच्या बांधकामास संबंधित प्राधिकरणाचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र/भोगवटा प्रमाणपत्र असल्याशिवाय फ्लॅट अथवा दुकानांच्या विक्रीच्या नोंदणी सब रजिस्ट्रार यांनी करू नये. असे आपल्या अधिनस्त असलेल्या सब रजिस्ट्रार यांना कळविण्यात यावे, ही विनंती.

सस्नेह.

आपला स्नेहांकित

(दिनेश वाघमारे)

प्रति,
मा.श्री. डॉ.बी. रामास्वामी एन.
भा.प्र.से.
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,
पुणे